# सायबर हल्ल्यामुळे विद्यापीठाचे नुकसान नाही

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या कॉम्प्युटर सर्व्हरवर चिनी हॅकर्सकडून सायबर हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली; मात्र हल्ल्यातून शिवाजी विद्यापीठाकडे असणारी कोणतीही माहिती हॅकर्सना हॅक करता आली नाही, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार गुरुवार, दि. १४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सायबर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला; मात्र शिवाजी विद्यापीठातर्फे अत्याधुनिक अशी सुरक्षा यंत्रणा यापूर्वीच कार्यान्वित करण्यात आली आहे. या सुरक्षा यंत्रणेकडून हल्ला झाल्याचा आणि त्यामुळे गती मंदावल्याचा सिग्नल देण्यात आला. विद्यापीठाची तांत्रिक बाजू सांभाळणाऱ्या तज्ज्ञांकडून तातडीने याबाबतची पावले उचलण्यात आली. अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणेमुळे हॅकर्सना कोणतीही माहिती मिळवता आली नाही.

शिवाजी विद्यापीठाचे मोठ्या प्रमाणात काम ऑनलाईन चालते. त्यामुळे विद्यापीठाच्या वेबसाईटला दररोज साडेतीन लाखांपेक्षा अधिक युजर्स भेट देतात. त्यामुळे अशा हॅकर्सची नजर विद्यापीठाच्या यंत्रणेकडे जाणे स्वाभाविक होते. या हल्ल्यानंतर शिवाजी विद्यापीठातील तज्ज्ञांनी वेळीच योग्य पावले उचलली आहेत. तज्ज्ञांनी तत्काळ डेटा प्रोग्राम चेक केला; मात्र यात कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे दिसून आले नाही. पुढील काळातही अशा प्रकारचा हल्ला झाला तरी विद्यापीठाची सुरक्षा प्रणाली सक्षम असल्याचा दावा विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आला आहे.



शिवाजी विद्यापीठ

## घाबरण्याचे कारण नाही



सायबर हल्ल्याचा प्रयत्न झाला; पण शिवाजी विद्यापीठाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे हॅकर्सना कोणतीही माहिती हॅक करता आली नाही. विद्यापीठाच्या संकेतस्थळाला दररोज साडेतीन लाखांहून अधिक लोक भेट देतात, तसेच ई गव्हर्नन्सबाबतीतही विद्यापीठाने उल्लेखनीय असे काम केले आहे. त्यामुळे हॅकर्सनी अशा प्रकारचा हल्ला करण्याचा प्रयत्न केला असावा. अशा प्रकारचा हल्ला पुन्हा केला तरी हॅकर्सना हाती काही लागणार नाही. विद्यापीठाची सुरक्षा प्रणाली मजबूत असण्याची पोचपावतीच या हल्ल्यामुळे मिळाली आहे. त्यामुळे विद्यार्थी किंवा पालकांनी घाबरण्याचे कारण नाही. विद्यापीठाची सर्व माहिती सुरक्षित आहे.

**-डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 SEP 2018
तरुण भारत



# विद्यापीठाची सर्व माहिती सुरक्षित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सर्व्हरवर अतिरिक्त आणि सततचा ताण असल्याचे जाणवले असताना त्यावर सायबर हल्ले होताना आढळले.पण त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. विद्यापीठाची सर्व माहिती सुरक्षित आह. असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली. अशा प्रकारे हल्ले करण्याचे प्रयत्न वेगवेगळया सर्व्हर्सवर होत असतात. तसे हल्ले परतवून लावण्याची सक्षम यंत्रणा कार्यन्वित आहे. सुरक्षेसाठीची फायरवॉल व्यवस्थित कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.